महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम , २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१८/प्र.क्र.८३२/एसएग २**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना: -

सेंट्रल एज्युकेशनल अँण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८ संचलित पी.ए.आय. हायटेक स्कूल, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८ या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित या तत्त्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम , २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सेंट्रल एज्युकेशनल अँण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८ संचलित पी.ए.आय. हायटेक स्कूल, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८ या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इयत्ता १ वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, S.S.C. Board) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती

१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम , २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची / तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम ,२००९ मधील तरतुदींची पूर्तता करून सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी ( इरादा पत्र ) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबधीत जिल्ह्याच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

आ) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी

Scanned with OKEN Scanner

उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आता शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

इ) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सीबी.एस.ई. मंडळाशी संलग्नेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परी. (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक , बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करून सदर संबधित शाळा विहित निकष , अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३)परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम , २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे <u>बंधनकारक</u> राहील.

(४) संबधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम , २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही . शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(६) **यु डायस डाटा :-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE ( Unified District Informatation System for Education) मध्ये महिती भरताना , **"स्वयंअर्थसहाय्यित तत्तावरील परवानगी प्राप्त शाळा"** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करून यु-डायस क्रमांक प्राप्त करून घेण्याबाबतची जबाबदारी संबधित संस्थेवर राहील . याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक , महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद , मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबधितांच्या माहितीकरिता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्तावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा "** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

Scanned with OKEN Scanner

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आ.ना.भोंडवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य , पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक , महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद , मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) , महाराष्ट्र राज्य, पुणे
४. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे.
५. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
६. निवडनस्ती ( एस एम २ )

Scanned with OKEN Scanner